# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

GOVERNMENT DENTAL COLLEGE AND HOSPITAL , MUMBAI.

सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, छ.शि.म.ट.स्थानका शेजारी, फोर्ट, मुंबई – ४०० ००१

St. George's Hospital Compound, P.D'mello Road, Near CST Station, Fort, Mumbai - 400 001.

Phone - 022 - 22620668 Email: deangdch_mumbai@yahoo.com Website : www. gdcmumbai.org


क्र.शादंमवरुमुं/खवि/अग्निशमन यंत्र रिफिल/दरपत्रके/ 3333 /२०२६, दि. 01/०७/२०२६.

प्रति,

..............................

..............................

विषयः- अग्निशमन यंत्र रिफिल करण्यासाठी दरपत्रके सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे नमुद केल्यानुसार या संस्थेच्या विविध विभागात तसेच वस्तिगृह विभागात लावण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रातील (Fire Extingisher) वायु संपल्याने विविध विभागांनी रिफिल करण्यासाठी पत्रव्यवहार केलेला आहे. भविष्यात उद्‌भवणाऱ्या आकस्मिक आपत्तीपासून (उदा. आग लागणे, शॉर्ट सर्किट इत्यादी) तसेच सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्याकरीता स्थानिक पुरवठादारांकडून रिफिल करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रके या कार्यालयात दिनांक.०८/०७/२०२६ पुर्वी सादर करण्यात यावी. उशिरा आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

| अ.क्र. | सामुग्रीचे नाव | विनिर्दिष्टये (SPECIFICATION) |
|---|---|---|
| ०१ | Fire Extingisher | Refilling for ABC type 02 kg. |
| ०२ | Fire Extingisher | Refilling for ABC type 05 kg. |
| ०३ | Fire Extingisher | Refilling for ABC type 06 kg. |

वर दर्शविल्याप्रमाणे दरपत्रकाचा अनुक्रमांक व तारीख व रिफिल करण्यात आलेल्या सामुग्रीचे नाव मोहरबंद लिफाफयात भरुन सदर दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई - ४०० ००१ या कार्यालयात दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्विकारली जातील. व दरपत्रकांचा सिलबंद लिफाफा खरेदी समिती समोर दिनांक.०९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. आपणांस जर दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

अधिष्ठाता,

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

**<u>अटि व शर्ती</u>**

१) सदर दरपत्रक सिलबंद पाकीटावर रिफिल करण्यात आलेल्या सामुग्रीचे नाव ठळकपणे नमुद करावे.

२) सदरील दरपत्रक अधिकृत लेटरहेड वर सादर करावे. त्या सोबत नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी क्लिअरन्स सर्टिफिकेट जीएसटी नंबरची किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅनकार्डची प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैद्य मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सामुग्री पुरवठा करण्यास कंपनीने प्राधिकृत व वैद्य प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग) इत्यादी. माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

३) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. तसेच वरील सर्व कामे ही एकाच फार्मच्या अखत्यारीत संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल निविदा देण्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाच्या अधिन राहून असावेत. सदर वस्तुची निव्वळ किंमत व इतर सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त साहित्य हे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसांत पुरवठा करण्यात यावे. सदरील सामुग्री पुरवठा करण्यास विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.

५) उपरोक्त नमुद सामुग्री ही विर्निदेशानुसार असणे आवश्यक असून, सामुग्री ही आयएसआय मार्क किंवा तत्सम समान दर्जाची व उत्कृष्ठ असणे आवश्यक आहे.

६) सदर बाबीसाठी कोणत्याही वस्तुसाठी शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रके वगळण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

७) संबंधित पुरवठादाराकडे अग्निशमन यंत्र रिफिल करण्याबाबत मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करुन देण्यात यावी.

८) दरपत्रकावरील सामुग्रीचा हमी कालावधी (वॉरंटी) नमूद करावा. तसेच सदर वस्तुचे नमुने तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

९) दुसरा व चौथा शनिवार व रविवार, तसेच जोडून आलेली सार्वजनिक सुटट्या वगळून दरपत्रके सादर करण्यात यावे याची नोंद घ्यावी. पोस्टाने पाठविलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

१०) दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांना आहे.

११) सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावीत.